ePaper
पाकड्यांनी भारत सोडला नाही तर कठोर शिक्षा, दंडाची कु-हाड कोसळणार!
वर्ष - 8 । अंक - 268 । UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज™

## आतील पानांत
- विराट कोहली कधीच विसरत नाही!
- मुंबई इंडियन्सने इतिहास घडवला!
- आता सर्जिकल स्ट्राइक नको!
- भारतात टेस्लाची पहिली कार दाखल

www.mahaenews.com | सोमवार, दि. 28 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भारताच्या हल्ल्याच्या भीतीने मदरसे, मशिदी पडल्या ओस !

# काश्मीरमध्ये सर्वात मोठे ‘कोंबिंग’ ऑपरेशन

## भारताचा संभाव्य ‘स्ट्राईक’ हा पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे!

। नवी दिल्ली / श्रीनगर / इस्लामाबाद ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये २७ हिंदू ठार झाल्यानंतर केंद्रातील मोदी सरकारच्या हालचालींना चांगलाच वेग आला आहे. त्यात पाकिस्तानी नागरिकांनी भारत सोडून जावे, यासाठी दिलेली मुदतही संपली. त्यामुळे आता कोणत्याही क्षणी पाकिस्तानवर हल्ला होण्याची शक्यता आहे.**

या सर्व पार्श्वभूमीवर भारताकडून हल्ला हा होणारच, हे गृहीत धरून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील सर्व मदरसे आणि मशिदी ओस पडल्या आहेत. भारताचे मुख्य ‘टार्गेट’ तेच असेल म्हणजे तेथे दहशतवादी राहत असल्यामुळे त्याच ठिकाणी हल्ले होतील, हे गृहित धरल्यामुळे तिकडे भाविकही फिरकत नाहीत, असे चित्र आहे. अनेक ठिकाणी शुक्रवारचे नमाज पठणही झाले नाही.

### जहाल दहशतवाद्यांची यादी तयार..

काश्मीर खोऱ्यात सक्रिय असणाऱ्या जहाल दहशतवाद्यांची यादी तयार असून त्यांचा शोध जारी आहे. दहशतवाद्यांना आसरा देणाऱ्या ४४६ जणांना काश्मीरमध्ये ताब्यात घेण्यात आले आहे. काश्मीर खोऱ्यात सध्या सर्वात मोठे ‘कोंबिंग ऑपरेशनव सुरू असून कोणत्याही परिस्थितीत दहशतवादाचे कंबरडे मोडण्याचा निर्धार मोदी सरकारने केला आहे.

### दहशतवाद्यांना पुलवामाची आठवण

पुलवामा हल्ल्याच्या वेळी भारताने पाकव्याप्त काशींमध्ये घुसून दहशतवाद्यांची ‘लॉन्च पॅड’ उद्ध्वस्त केली होती, तशीच कारवाई आता होणार अशी भीती पाकिस्तानला वाटत आहे, त्यामुळे नुसते दहशतवाद्यांचे नव्हे, तर पाकिस्तानचेही धाबे दणाणले आहे.

### मदरसे, मशिदीतून दहशतवादी गायब

दहशतवाद्यांची प्रामुख्याने राहण्याची ठिकाणे म्हणजे मदरसे आणि मशिदी ! भारताची हल्ल्याची तयारी अंतिम टप्प्यात असल्यामुळे तेथे वास्तव्यास असलेल्या दहशतवाद्यांना सरकारनेच बाहेर काढले आहे. त्यामुळे पाकव्याप्त काश्मीरमधील गिलगिट आणि बाल्टिस्तान मधील मशिदी ओस पडल्या आहेत. तीन दिवसात या ठिकाणांवर राहत असलेले दहशतवादी हटवण्यात आले असून त्यांना पाकिस्तानने सुरक्षित ठिकाणी लपवले असावे, असा अंदाज आहे.

### उरलेली जमीनही उद्ध्वस्त करणार..

पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांची उरलेली जमीनही आता उद्ध्वस्त केली जाणार असल्याची सूचना मोदी सरकारने दिली आहे. त्याचप्रमाणे सिंधू जल करार निलंबित करून भारत आक्रमक झाल्याचा मोठा इशारा पाकिस्तानला मिळाला आहे. या सर्व प्रकारामुळे दहशतवाद्यांमध्येच आता दहशत निर्माण झाली आहे.



## मदरसा मशिदी दहशतवाद्यांचे अड्डे !

### पाकचे सैन्य गिलगिट आणि बाल्टिस्तानमध्ये

भारत हल्ल्यासाठी सज्ज झाला असून कोणत्याही क्षणी हल्ला होईल, या भीतीने पाकिस्तानी सैन्य गिलगिट आणि बाल्टिस्तान मध्ये तैनात केले जात आहे. अतिरेक्यांच्या अड्ड्यांमधून त्यांच्या म्होरक्यांनी देखील पोबारा केला असल्याचे वृत्त आहे.

### भारताच्या हल्ल्याविषयीचे अंदाज

पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेण्यासाठी भारताची पावले असतील, असे समजून पाकिस्तानने त्यांची युद्धनीती आखल्याचे समजते आणि मुख्य युद्ध झाले तर याच भागात धडकेल असाही त्यांच्या सुरक्षा यंत्रणेचा अहवाल आहे.

### भारत सोडून जाण्यासाठी रांगा

दरम्यान,भारतात वास्तव्य करून राहत असलेल्या पाकिस्तानी नागरिकांसाठी भारत सोडण्याची ‘डेडलाईन’ रविवारी संपणार होती, त्यामुळे सीमेवर वाहनाच्या रांगाच्या रांगा लागल्या होत्या. प्रत्येकाची कागदपत्रे पाहून पाकिस्तानच्या गेटवर जाऊ दिले जात होते. जे मागे राहतील, त्यांचा शोध घेऊन त्यांनाही पाकिस्तान सीमेवर सोडले जाणार आहे. या दहशतवादी हल्ल्यामुळे संपूर्ण देशात संतापाची लाट आहे आणि बदल्याची भावना फारच तीव्र आहे.

### उच्चस्तरीय बैठकांचा सिलसिला!

भारताची युद्ध सज्जता आणि युद्ध अपेक्षित धरून केला जाणारा सराव सुरूच होता. वेगवेगळ्या प्रकारचे नियोजन करण्यासाठी अनेक उच्चस्तरीय बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. प्रामुख्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल आणि तिन्ही दलाच्या प्रमुखांची विविध बैठकांसाठी धावपळ सुरू असल्याचे राजधानी दिल्लीतील चित्र आहे.

## घौरी, शाहीन क्षेपणास्त्रे प्रदर्शनामध्ये ठेवण्यासाठी? : पाकिस्तानच्या धमक्या!

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू पाणी करार रद्द केला. यामुळे पाकिस्तान चांगलाच संतापला आहे. पाकिस्तानी नेते भारताला धमकी देणारी आणि चिथावणीखोर वक्तव्ये करत आहेत. आता पाकिस्तानचे रेल्वेमंत्री हनीफ अब्बासी यांनीही भारताला अणुहल्ल्याची उघड धमकी दिली आहे. पाकिस्तानची अण्वस्त्रे आणि घौरी, शाहीन आणि गझनवी सारखी क्षेपणास्त्रे भारताविरुद्ध तयार ठेवण्यात आलीआहेत, अशी अब्बासी यांनी उघडपणे धमकी दिली आहे, आमची क्षेपणास्त्रे प्रदर्शनात ठेवण्यासाठी नाहीत, असा कांगावाही त्यांनी केला आहे.

ePaper
पाकड्यांनी भारत सोडला नाही तर कठोर शिक्षा, दंडाची कु-हाड कोसळणार!

| वर्षं - 8 | अंक - 268 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | सोमवार, दि. 28 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




## आतील पानांत


- विराट कोहली कधीच विसरत नाही!
- मुंबई इंडियन्सने इतिहास घडवला!
- आता सर्जिकल स्ट्राइक नको!
- भारतात टेस्लाची पहिली कार दाखल


### पहलगाम हल्ल्यानंतर अटारी-वाघा बॉर्डर बंद

# देशभर अलर्ट जारी!

## पाकिस्तानकडून सातत्याने भारताला धमकी; ठिकठिकाणी सुरक्षेत वाढ

। मुंबई / पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात देशाच्या 28 नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्यामुळे संपूर्ण देशात संतापाचा लाट पसरली आहे. हल्लेखोर दहशतवाद्यांनी यावेळी पर्यटकांनाच लक्ष्य केलं. त्यामुळे जगभरात या घटनेवर संताप व्यक्त केला जातोय. या हल्ल्यात दोन परदेशी नागरिकांचादेखील मृत्यू झाला आहे. या हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचं स्पष्ट झालं आहे. पाकिस्तानकडून दहशतवाद्यांना खतपाणी घातलं जातं. त्यामुळे भारताने पाकिस्तानवर निर्बंध घातले आहेत. तसेच भारताने भारत-पाक सीमेवरील सिंधू करार देखील रद्द केला आहे. याशिवाय पाकिस्तानी नागरिकांसाठीचा विझा रद्द केला आहे. या हल्ल्यानंतर अटारी-वाघा बॉर्डर बंद करण्यात आली आहे. तिथले चेक-पोस्ट बंद करण्यात आले आहेत. या हल्ल्यानंतर पाकिस्तानकडून सातत्याने भारताला धमकी दिली जात आहे. तिथल्या मंत्र्यांकडून प्रक्षोभक वक्तव्ये केली जात आहेत. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आता मुंबईत अलर्ट जारी करण्यात आला आहे.**




दहशतवाद हल्ल्याच्या घटनांचा इतिहास पाहिला तर मुंबईचं या हल्ल्यांमध्ये मोठं नुकसान झालं आहे. मुंबईत एकेकाळी साखळी बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आले होते. तसेच त्यानंतर 26/11 चा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्याच्या जखमा कधीही भरुन निघणार नाहीत, अशा आहेत. पहलगाम येथील हल्ल्यानंतर अतिरेक्यांकडून पुन्हा मुंबईवर लक्ष्य केलं जाऊ शकतं. कारण मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. इथे कोट्यवधी नागरीक राहतात. याआधीच्या हल्ल्यात मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकावर (सीएमएमटी) येऊन दहशतवाद्यांनी गोळीबार केला होता. त्यामुळे अशा घटनेची पुनरावृत्ती घडू नये यासाठी पोलीस सतर्क झाले आहेत. केंद्र सरकारनं पाकिस्तानी नागरिकांना भारतात प्रवेश करण्यास मनाई केली आहे. पाकिस्तानी नागरिकांना दिलेला सार्क व्हिसा रद्द करण्यात आला आहे. कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वर यांनी जे बेकायदेशीरपणे किंवा कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय राज्यात असतील त्यांना शोधून देशाबाहेर पाठवलं जाईल असं म्हटलं. केंद्र सरकारनं पाकिस्तानच्या पासपोर्ट धारकांना दिलेला सार्क व्हिसा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. जी परमेश्वरा यांनी ज्यांच्याकडे योग्य कागदपत्रं नसतील त्यांची कसून चौकशी केली जाईल, असं म्हटलं. एएनआयशी बोलताना ते म्हणाले की केंद्रीय गुप्तचर यंत्रणांसोबत समन्वयानं काम करत आहोत. कर्नाटकात विशेषत: बंगळुरुत एखादा पाकिस्तानी नागरिक सापडल्यास त्याला ताब्यात घेऊन पाकच्या उच्चायुक्ताकडे सोपवण्यात येईल.

कर्नाटकच्या पोलिसांनी बेकायदेशीर किंवा अवैधपणे राज्यात राहणाऱ्या पडताळणीसाठी किंवा शोधण्यासाठी पथकं स्थापन करण्यात आली आहे. या पथकांकडून लॉज, गेस्ट हाऊस किंवा वस्त्यांमध्ये शोध घेतला जाईल. सीबीआय आणि आयबीच्या अधिकाऱ्यांना देखील स्थानिक पोलीस स्टेशनला भेटी देण्यासंदर्भात आदेश दिले गेले आहेत. संभाव्य स्लीपर सेलच्या हालचाली किंवा कारवाया रोखण्यासाठी सीबीआय आणि आयबीची मदत घेण्याचा कर्नाटक सरकारचा प्रयत्न आहे. परमेश्वरा यांनी नुकत्याच पार पडलेल्या कर्नाटक विधानसभेच्या अधिवेशनात 137 बेकायदेशीर नागरिकांना पकडल्याची माहिती दिली होती.त्यापैकी 25 जण पाकिस्तानी होते. 137 पैकी 84 जणांना बंगळुरुतून ताब्यात घेण्यात आलं होतं.

### सीएसएमटी स्थानकाची सुरक्षा वाढवली

पहलगाम येथील हल्ल्यानंतर आता मुंबईतदेखील अलर्ट जारी करण्यात आलं आहे. वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त आणि आरपीएफ यांच्याकडून पाहणी केली जाणार आहे. खबरदारी म्हणून सीएसएमटी स्थानकाची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. आरपीएफ, जीआरपी, एमएसएफ, डॉग स्क्वॉडकडून संयुक्त गस्तीला सुरुवात झाली आहे. तसेच सीएसएमटी स्थानकाच्या सुरक्षेची आज संध्याकाळी सात वाजता पाहणी केली जाणार असल्याची माहिती आहे. मुंबईत पोलीस हाय अलर्टवर आहेत. तसेच सर्वच ठिकाणी चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली जात आहे.

बंगळुरुत यापूर्वी चर्च स्ट्रीट (2014), चिन्नास्वामी स्टेडियम (2010) मध्ये हल्ला झाला होता, हा दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. गुप्तचर विभागाच्या एका गोपनीय माहितीनुसार बंगळुरुच्या बाहेरील भागात असलेल्या जिगानी औद्योगिक पट्ट्यात छापेमारी केली होती. त्यावेळी एका पाकिस्तानी व्यक्तीला आणि इतर तीन जणांना बनावट कागदपत्रांच्या आधारे राहणाऱ्या तीन जणांना अटक केली होती. प्राथमिक तपासात बनावट पासपोर्ट आणि ओळखपत्र तयार करणाऱ्या मोठ्या गोपनीय नेटवर्कशी संबंध असल्याचं समोर आलं होतं. तपासयंत्रणांच्या इशाऱ्यानुसार स्लीपर सेल काही महिने आणि काही वर्षं निष्क्रिय असतात.

# ‘पीएमआरडीए’हद्दीत डीपी ऐवजी टीपी स्कीम!

## आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी हवी : मुख्यमंत्री

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत पुढील काळातील नवे पुणे आहे. त्यामुळे नव्या पुण्याचा विचार करून बारा मीटर रुंदीच्या रस्त्यांचे जाळे करण्याची आणि त्यानंतर नगर रचना योजना (टीपी स्कीम) राबविण्याची सूचना प्रशासनाला करण्यात आली आहे, असे सांगत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीएमआरडीएच्या हद्दीत डीपी (विकास आराखडा) ऐवजी टीपी स्कीम राबविण्यात येईल, असे संकेत रविवारी दिले.**



‘पुणे अर्बन डायलॉग : आव्हाने आणि उपाय’ या परिषदेत ते बोलत होते. राज्य शासनाकडून पीएमआरडीएचा विकास आराखडा रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे नव्याने विकास आराखडा करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. मात्र त्याचबरोबर टीपी स्कीमही राबविण्यात येईल, असेही बोलले जात आहे. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी तसे स्पष्ट संकेत दिले.पीएमआरडीएच्या हद्दीचा विकास आराखडा रद्द करून अहमदाबाद, लखनौ या सारख्या बारा मीटर रुंदीचे जाळे निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानंतर नगर रचना राबवून विकास केला जाईल. नगर रचना ही एक चांगल्या प्रकारचे विकासाचे प्रारूप (मॉडेल) आहे. पीएमआरडीए पे पुढचे नवे पुणे आहे. त्यामुळे एक नवीन शहर निर्माण केले जाणार आहे.

या हद्दीत केवळ सहा मीटर आणि नऊ मीटर रुंदीचे रस्ते केले तर, या नव्या पुण्याची अवस्था भविष्यात काय होईल, याचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे.राज्य शासनाडून विकास आराखड्यांना मंजुरी दिली जात आहे. शहराचा विकास आराखडा करताना स्वच्छता, पाणीपुरवठा, वाहतूक, पर्यावरण, प्रदूषण, सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापन याचा विचार केला जातो. येत्या काळात अर्बन डिझायनिंग या संकल्पनेचाही विचार केला जाईल. विकास आराखडा करताना त्याची अंमलबजावणी होते की नाही, हे पाहण्याची आवश्यकता आहे. जैव विविधता उद्यान आरक्षण (बीडीपी) तसेच डोंगर माथा-डोंगरउतार हे चांगल्या उद्देशाने ठेवण्यात आले होते. मात्र त्यातून पर्यावरणाचे खरेच रक्षण झाले का, याचा विचार करावा लागेल. त्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील, असे नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.‘पुणे अर्बन डायलॉग : आव्हाने आणि उपाय’ या परिषदेत ते बोलत होते. राज्य शासनाकडून पीएमआरडीएचा विकास आराखडा रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे नव्याने विकास आराखडा करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. मात्र त्याचबरोबर टीपी स्कीमही राबविण्यात येईल, असेही बोलले जात आहे.

### एक नवीन शहर निर्माण केले

या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी तसे स्पष्ट संकेत दिले. पीएमआरडीएच्या हद्दीचा विकास आराखडा रद्द करून अहमदाबाद, लखनौ या सारख्या बारा मीटर रुंदीचे जाळे निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानंतर नगर रचना राबवून विकास केला जाईल. नगर रचना ही एक चांगल्या प्रकारचे विकासाचे प्रारूप (मॉडेल) आहे. पीएमआरडीए पे पुढचे नवे पुणे आहे. त्यामुळे एक नवीन शहर निर्माण केले जाणार आहे. या हद्दीत केवळ सहा मीटर आणि नऊ मीटर रुंदीचे रस्ते केले तर, या नव्या पुण्याची अवस्था भविष्यात काय होईल, याचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे.राज्य शासनाडून विकास आराखड्यांना मंजुरी दिली जात आहे.

# यंदाच्या उन्हाळ्यात राज्यभर जलशोष!

## जास्त पाऊस होऊनही राज्यात वाढत्या तापमानाने टंचाई

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जागतिक तापमानवाढीमुळे दर वर्षीच ऊन जरा जास्त असते, तसे यंदाही. पण, तेच केवळ पाणी आटवणारे नसून, ‘प्रगत’ महाराष्ट्राला पावसाचे पाणी अजूनही नीट साठवता येत नसल्याने जनतेच्या घशाला कोरड आहे. गेल्या पावसाळ्यात राज्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. तरी बहुतांश भागांत, अगदी छोट्या-मोठ्या शहरांतही रोज पाणी देणे अशक्य आहे.**



परिणामी टँकरवर भिस्त. शिवाय, विंधन विहिरींतून वारेमाप उपसा आणि पाणी वापराच्या बेशिस्त सवयींपोटी त्याचा प्रचंड अपव्यय. अशात पाणी पुरविण्यासाठीच्या योजनांत पाण्यापेक्षा अर्थकारण अधिक मुरते, या वास्तवाने भर घातल्याने यंदाच्या उन्हाळ्याची सावलीही कोरडीच असल्याचे चित्र आहे. ‘लोकसत्ता’च्या राज्यातील विविध भागांतील बातमीदारांनी त्या-त्या ठिकाणच्या प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पाण्याची सद्या:स्थिती जाणून घेतल्यावर पाणी नियोजनाच्या अभावाची झळ अधिक प्रकर्षाने दिसली.मनमाडसारख्या ठिकाणी गेली काही वर्षे १३ दिवसांआड पाणी येते, तर पिंपरी-चिंचवडसारख्या प्रगत उद्योगनगरीलाही सहा वर्षे एक दिवसाआड पाण्यावरच काढावे लागत आहेत. उन्हाळ्याचा अजून जवळपास दीड महिना शिल्लक असून, सामान्यांना टंचाईची झळ बसू द्यायची नसेल, तर शिल्लक पाण्याचे उत्तम नियोजन आणि समान वाटप हेच आता प्रशासनापुढचे आव्हान आहे.नाशिक : उत्तर महाराष्ट्रात नाशिक आणि जळगाव या दोन जिल्ह्यांत ६४ गावे आणि १३८ वाड्यांना ६६ टँकरव्दारे पाणीपुरवठा केला जात आहे. नंदुरबार आणि धुळे जिल्हे अजून तरी टँकरमुक्त आहेत. राष्ट्रवादीचे माजी मंत्री छगन भुजबळ यांच्या येवला तालुक्यात ३१ गावे आणि ४१ वाड्यांसह ७२ ठिकाणी २९ टँकर सुरू आहेत. मनमाड येथे १३ दिवसांआड दोन तास, येवल्यात पाच दिवसांआड एक तास तर, मालेगाव येथे दोन दिवसांआड एक तास नळ पाणीपुरवठा केला जातो आहे. जळगाव शहरात तीन दिवसांआड, भुसावळमध्ये १५, असोद्यात १५ ते २० आणि नशिराबादला पाच ते सहा दिवसांआड नळ पाणीपुरवठा होत आहे. पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या जळगाव जिल्ह्यात टंचाई निवारणार्थ १५ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून, धुळे जिल्ह्यात २९ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात सध्या १९२ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. बहुतांश शहरांत रोज पाणी येतच नाही. जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद नगरपालिकेमध्ये १० दिवसांतून एकदा पाणीपुरवठा होतो. भोकरदनमध्ये पाच-सहा दिवसांतून एकदा पाणी येते. अंबडमध्ये हा कालावधी नऊ दिवसांतून एकदा असा आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर, खुलताबाद, फुलंब्री या नगरपरिषदांत चार दिवसांतून एकदा पाणी दिले जाते. लातुरात अनेक ठिकाणी अगदी स्वयंपाकघरातील लहान पातेलेही पाण्याने भरून ठेवली जात आहेत. मराठवाड्यातील प्रत्येक शहरात आता पाणी शुद्धीकरणाचे ‘आरओ – केंद्र’ अनेक व्यावसायिकांनी सुरू केले आहे. ४० लिटरच्या पाण्यासाठी ३० रुपये आकारले जातात.

### पश्चिम महाराष्ट्रात शहरे कोरडी

पश्चिम महाराष्ट्रात सोलापूरकरांना महापालिका प्रशासनाकडून पाच ते सहा दिवसांआड पाणीपुरवठा केला जातो. उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनी योजनेचे काम अंतिम टप्प्यात आहे. ही योजना सुरू झाल्यास १३ लाख लोकसंख्येच्या सोलापूरची तहान भागवण्यासाठी उजनी धरणातून दर तीन महिन्यांतून एकदा चार ते पाच टीएमसी एवढे प्रचंड पाणी सोडावे लागणार नाही.

## प्लास्टिक वापरणाऱ्या 1623 जणांवर कारवाई

# ‘ग्रॅप’चा वायु प्रदूषण करणाऱ्यांना तडाखा!

## 74 लाख 88 हजारांचा दंड वसूल

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**औद्योगिक व नागरी वसाहतीत प्लास्टिक वापर आणि वायू प्रदूषण करणाऱ्या 1 हजार 623 जणांना महापालिकेने दंडात्मक कारवाईचा दणका दिला आहे. त्यांच्याकडून तब्बल 74 लाख 88 हजार रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने सुरू केलेल्या ‘ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लान’ अर्थात ग्रॅप च्या माध्यमातून ही कारवाई केली गेली.**



गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात हा प्रकल्प सुरू करण्यात आला. प्रत्यक्षात गेल्या पाच महिन्यांत वेगवेगळ्या प्रभागात दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. महापालिका कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू आहेत. रहिवाशी भागात आरएमसी आणि स्टोन क्रशर प्लांटदेखील सुरू आहेत. महापालिकेच्या विविध विकासकामे सुरू आहेत. त्यामुळे शहरातील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. या प्रकल्पासाठी मसेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग (सीडॅक) द्वारे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रॅप उपक्रमात सुरुवात करण्यात येणार आहे. महापालिकेने हवा शुद्धीकरण, धूळ घालविणारी उपकरणे, रस्ता साफसफाईसाठी वाहने (रोड वॉशर) आणि स्प्रिंकल आधारित विविध चौकातील पाण्याचे फवारे अशा विविध यंत्रणेकडून हवा प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचा प्रयत्न सुरू आहेत.

ग्रॅप प्रणालीचा एक भाग म्हणून पर्यावरणीय प्रदूषणाचा सामना करण्यासाठी ठोस उपाययोजना सुरू केल्या आहेत. पथकात 1 प्रोजेक्ट मॅनेजर, 4 पर्यवेक्षक, 32 जण प्रत्यक्ष जागेवर कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांकडून शहरामध्ये रात्रं-दिवस गस्त घातली जात आहे.

### पथकाच्या कामाचे स्वरूप

रस्त्यावरील धूळ नियंत्रित करणे, कचऱ्याची विल्हेवाट लावणे, वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यावर लक्ष केंद्रित करणे. डिझेल जनरेटरवरील निर्बंध घालणे, रस्त्यांची स्वच्छता आणि सार्वजनिक वाहतुकीचा प्रचार आदींचा समावेश आहे. प्रदूषण करणारे उद्योग बंद करणे.

> “ हवा प्रदूषण रोखण्यासाठी पालिकेने उपद्रव शोधपथक नियुक्त केले आहे. बांधकामावर नियंत्रण ठेवण्यासाठी दंडात्मक कारवाई केली जात आहे. त्यामुळे प्रदूषण होणाऱ्या पटकांवर प्रभावीपणे कारवाई करण्यास मदत होत आहे. शहराला प्रदूषणमुक्त करण्यासाठी हा उपक्रम सुरू केलेला आहे.
>
> **-संजय कुलकर्णी,** मुख्य अभियंता, महापालिका.

## नदी सुधार प्रकल्प तूर्तास थांबवा !

## विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची महापालिका आयुक्त यांना सूचना

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नदी सुधार प्रकल्प राबवून पिंपरी चिंचवड शहरातील नद्यांवर अन्याय केला जात आहे या नागरिकांच्या भूमिके विषयी विचार केला जाईल. तूर्तास हे काम थांबवण्याचे आदेश पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांना दिले असल्याचे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक, पर्यावरणप्रेमी व सामाजिक संस्थांनी नदी सुधार प्रकल्पाला विरोध दर्शवला असून सातत्याने आंदोलने केली जात आहेत. रविवारी (२७ एप्रिल) पुन्हा नदी सुधार प्रकल्पाच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. यावेळी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी मुळा नदीकाठी आंदोलकांची भेट घेतली. नदी सुधारच्या नावाखाली तसेच शहरात होत असलेल्या बेकायदेशीर वृक्षतोडीबाबत पर्यावरण प्रेमींनी बनसोडे यांना माहिती दिली. त्यावर अण्णा बनसोडे यांनी नदी सुधार प्रकल्पाचे काम तात्काळ थांबवण्याच्या सूचना पुणे आणि पिंपरी-चिंचवड मनपा आयुक्तांना दिले आहेत.


> “ या कामाची चौकशी करून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केली जाईल. त्यानंतर नदी सुधार प्रकल्पाबाबत निर्णय घेतला जाईल, अवैधपणे वृक्षतोड करून पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. त्याबाबत संबंधितांना सूचना दिल्या जातील.
>
> **-अण्णा बनसोडे,** उपाध्यक्ष, विधानसभा महाराष्ट्र राज्य




पिंपळे निलख येथील शहीद अशोक कामठे उद्यान ते पिंपळे निलख स्मशानभूमी जवळील नदी पात्रा पर्यंत नागरीक व पर्यावरणप्रेमींनी पदयात्रा काढली. या पदयात्रेत सुमारे तीन हजार नागरिकांनी सहभाग घेतला.

आंदोलकांनी यावेळी आपली भूमिका मांडली. नदी सुधार प्रकल्प राबवताना नदी काठची सुमारे ४० हजार झाडे तोडली अथवा पुनर्रोपणाच्या नावाखाली मारली जाणार आहेत. नदीकाठच्या अनेक देवराया नष्ट केल्या जाणार आहेत. या नदी सुधार प्रकल्पामुळे जैव विविधता नष्ट होणार आहे. नद्यांचे पात्र अरुंद होऊन पुराचा धोका वाढणार आहे. विदेशातील नद्यांचे अनुकरण करून पिंपरी-चिंचवड शहरात नदी सुधार प्रकल्प सुरु केला जात आहे. मात्र परदेशात आता तटबंध काढून नद्या नैसर्गिक रुपात आणण्याच्या योजना सुरू आहेत. आरोप यावेळी आंदोलकांनी केले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नामधारकाने टाळण्याच्या गोष्टी

आपले विचार स्वार्थाचे नसावेत. स्वार्थामध्ये अभिमान नेहमी जागृत असतो. स्वार्थी मनुष्याला जगात सुख मिळणे कधीही शक्य नाही. नीतीची बंधने पाळा. परस्त्री मातेसमान माना. प्रपंचात एकपत्नीव्रताने राहणारे गृहस्थ लोक ब्रह्मचारीच होत. परद्रव्याची अभिलाषा धरू नका. त्याला विष्ठेसमान माना. दुसऱ्याच्या पैक्याचा अभिलाष धरण्यात आपला किती घात आहे याची नुसती कल्पनाच केलेली बरी. परस्त्री, परद्रव्य, यांच्याप्रमाणेच परनिंदा हीही अत्यंत त्याज्य आहे. परनिंदेने न कळत आपण आपलाच घात करीत असतो. परनिंदेमध्ये दुसऱ्यांच्या दोषांचे चिंतन होत असल्या कारणाने, ते दोष आपल्याकडे येत असतात. या सर्व गोष्टी सांभाळून तुम्ही नाम घ्या, नामाचे प्रेम तुम्हाला अगदी खात्रीने येईल. हे सर्व करीत असताना तुमचे आईवडील, बायकोमुले, यांच्या बाबतीत असलेले कर्तव्य करायला चुकू नका आणि त्या कर्तव्यात आसक्ती राहू देऊ नका. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता केलेले कर्म हे कर्तव्यच होय. ते कर्तव्य सांभाळून नीतिधर्माने वागून आपला प्रपंच करा, आणि भगवंताचे स्मरण ठेवा. मग तुमचा प्रपंचच परमार्थरूप बनून भगवंताचे प्रेम तुम्हाला मिळेल हा माझा भरवसा तुम्ही बाळगा. प्रपंच हा मिठासारखा आहे. भाकरीत मीठ किती घालायचे असते ? तर अगदी थोडे-फक्त चवीपुरते ! परंतु आपण मिठाची भाकरी करतो आणि त्यात परमार्थाचे चिमूटभर पीठ टाकतो; मग ती भाकरी खाता येईल का ? खरे समाधान मिळाल्यावर मनुष्य खेळासारखा प्रपंच करतो. त्यामध्ये तो वर चढला किंवा खाली पडला तरी सारखाच राहील; दुसऱ्याने डाव टाकल्यावर तो आपणही डाव टाकील ! पण डाव हरला किंवा जिंकला तरी त्याची त्याला पर्वा राहणार नाही. प्रपंचात अनेक वस्तू आहेत, पण भगवंताजवळ एकच वस्तू आहे. प्रपंचात कितीही वस्तू आणल्या तरी त्या पुऱ्या पडत नाहीत, कारण एका वस्तूच्या आणण्यामध्येच दुसऱ्या वस्तूच्या आणण्याचे बीज आहे. पण भगवंताचे तसे नाही; भगवंताची वस्तू एकदा आणली की पुन्हा ती आणायला नको. समजा, एका दुकानात पुष्कळ माल भरलेला आहे; पण आपल्याला पाहिजे ती वस्तू तिथे नाही, म्हणजे आपल्या दृष्टीने तिथे काहीच नाही ! त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या मानसिक शक्ती असून तिथे भगवंत नसेल, तर त्या असून नसून सारख्याच समजाव्यात. परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावा. यातच जन्माचे सार्थक आहे.

**बोधवचन:- परमार्थात अहंकार मिसळला की तो प्रपंच झाला. प्रपंचातला अहंकार दूर झाला की तो परमार्थ.**



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# हिरव्या दहशतवादावर आता भगव्या क्षेपणास्त्रांचा उतारा !

**भारताचे नंदनवन मानल्या गेलेल्या काश्मीरच्या पहलगामधील क्रूर हल्ल्याने सारा देश हादरला आहे. त्यामागे मोठे नियोजन आहे आणि त्याला पाकड्यांच्या लष्कराची साथ आहे, हे उघड सत्य आहे. या हल्ल्याचे 'टायमिंग' पाहता अनेक अनुत्तरित प्रश्न काय सांगत आहेत? हे लक्षात घेतले पाहिजे. दहशतवाद्यांनी हिंदू पुरुष पर्यटकांवर बेछूट गोळ्या झाडल्या आणि निष्पाप २७ जणांचा बळी घेतला.**



### बघा, अचूक 'टायमिंग' साधले..

हा हल्ला झाला, त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियात, तर अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स भारत दौऱ्यावर होते. म्हणजेच, एकाच दगडात अनेक पक्षी मारण्याचे 'टायमिंग' दहशतवाद्यांनी आणि या हल्ल्याच्या क्रूर सूत्रधारांनी साधले आहे. यापूर्वीही काश्मीरमध्ये अनेक दहशतवादी हल्ले झालेले आहेत. पठाणकोट, उरी आणि बारामुल्ला, अमरनाथ यात्रा, पुलवामा..मात्र, आताचा हा हल्ला फार महत्त्वाचा आहे.

### पाकिस्तानचा पोटशूळ उठला !

या हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी तत्काळ सौदी अरेबियाचा दौरा आटोपून मायदेश गाठला.. म्हणजे नियोजित गाठीभेटी आणि अनेक महत्त्वपूर्ण बाबी तसेच करार अपूर्ण राहिले. आखातातील मुस्लिम देशांचे भारताशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित होणे, त्यांच्याशी व्यापार, दळणवळण, संरक्षण अशा विविध क्षेत्रात सहयोग होणे, हे पाकिस्तानला रुचणारे नाही. त्यात मिठाचा खडा कसा टाकता येईल, भारताचे प्रयत्न कसे विफल होतील, यात त्यांना अधिक रस, तर अमेरिकन उपाध्यक्ष भारतात आले असताना हा हल्ला घडवून काश्मीरकडे संपूर्ण जगाचे लक्ष वळविणे, हा सुद्धा हेतू आहे.

### सुगावा नाही, हेच आपले अपयश !

हातात अत्याधुनिक रायफल्स घेऊन पायी जाणारे दहशतवादी कुणालाच कसे दिसले नाहीत ?उन्हाळ्यात पर्यटकांनी बहरणाऱ्या या भागात दहशतवादी अचानक कसे येऊ शकतात? दहशतवाद्यांच्या रेकीचा आपल्या कुठल्याच यंत्रणेला सुगावा कसा लागला नाही ? दहशतवादी त्याच परिसरात मुक्कामाला असतील तर त्याचा थांगपत्ताही आपल्याला कसा नाही? हे सारे अपयश कुणा एकाचे नक्कीच नाही. त्यास अनेक जण जबाबदार आहेत. केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक पोलीस, प्रशासन, लष्कर, गुप्तहेर खाते, निमलष्करी दल, स्थानिक नागरिक, व्यावसायिक असे सारेच.. हे सगळ्यांनीच मान्य करायला हवे!

### तोंडाच्या वाफा नकोत, कृती हवी..

अशा प्रकारचा हल्ला झाला, की पाकिस्तानशी दोन हात करण्याची भाषा बोलली जाते. सर्जिकल स्ट्राईकचेही धुमारे फुटतात. मुळात हल्ल्याच्या मुळाशी जाण्याचे सोडून आपण फांद्यांकडेच पाहतो. पुलवामा हल्ल्याचेच उदाहरण घेता येईल. त्या हल्ल्यासाठी जे आरडीएक्स वापरण्यात आले ते कुठल्या मार्गाने आणि कसे आले? सैनिकांची बस त्या मार्गानेच जाणार आहे, याची माहिती दहशतवाद्यांना कशी अचूक मिळाली? प्रत्यक्ष हल्ला झाला तोपर्यंत आपल्या साऱ्याच यंत्रणा कशा झोपल्या होत्या? या सर्वांचा थांगपत्ता आजवर लागलेला नाही. किंबहुना त्यावर कुणीच बोलत नाही. त्याची चौकशी होत नाही की दोषींवर कारवाई सुद्धा ! 'पाकव्याप्त काश्मीर घेऊनच राहू', 'आता पाकिस्तानला धडा शिकवू', अशा प्रकारची प्रसिद्धीलोलुप वक्तव्ये करून काही साध्य होत नाही. याउलट बोलण्यापेक्षा आधी कृती हवी आहे.

### दहशतवाद्यांचे इप्सित साध्य?

वास्तविक, ३७० कलम हटविल्यानंतर काश्मीरमध्ये शांतता आहे, तेथे विकासाची कवाडे खुली झाली आहेत, पर्यटन व्यवसाय भरभराटीस आहे, असा प्रचार सुरू आहे. ही बाब हेरूनच दहशतवाद्यांनी ऐन पर्यटन हंगामाच्या प्रारंभी हल्ला केला आहे. त्यामुळे आता पुढील काही महिने पर्यटक तेथे जाण्यास धजावणार नाहीत, याचाच अर्थ त्यांचे इप्सित साध्य होणार! या हल्ल्यामुळे काश्मीरमध्ये पुन्हा बेरोजगारी वाढण्याची भीती आहे. परिणामी माथेफिरू तरुणांना आपल्या गळाला लावणे, दहशतवाद्यांना शक्य होणार आहे.

### चर्चा बास, आता मुसक्या आवळा !

दहशतवादी गटांकडून अतिशय नियोजनपूर्वक आणि थंड डोक्याने हल्ल्याला पूर्णत्व दिले जाते. मुंबई हल्ल्याच्या कटातील आरोपी तहव्वूर राणा याचे अमेरिकेतून भारतात यशस्वी प्रत्यार्पण झाले आहे. या खटल्यातून आणि त्याच्या चौकशीतून पाकचा नापाक बुरखा जगासमोर येणार आहे. त्यामुळेही पाकिस्तान आणि दहशतवाद्यांचा जळफळाट झाला आहे. यातूनच आक्रमक होत पहलगामचा हल्ला असू शकतो. हल्ल्यानंतर पाकिस्तानच्या नाकाबंदीसाठी भारत सरकारने पाच मोठे निर्णय घेतले. मात्र, दहशतवाद्यांचे हल्ले आपण का रोखू शकत नाही? दहशतवाद्यांच्या काश्मीरमधील मुसक्या आवळण्यासाठी नक्की काय करायला हवे? याचा सर्वंकष विचार करायला हवा.

### देशाच्या अंतर्गत सुरक्षेला धोका..

कुठल्याही घटना घडल्या की त्याला धार्मिक रंग देणे आणि धार्मिक भावना चेतवणे, याने देश दुभंगतो आहे, फुटीची बीजे रोवली जात आहेत, यातूनच देशाच्या अंतर्गत सुरक्षेला मोठा धोका निर्माण होतो आहे. खरे तर, अशा प्रकारच्या कुटील कारवायांवर सर्जिकल स्ट्राईक करण्याबरोबरच पाकिस्तानला आणि दहशतवाद्यांना धडा शिकवण्याचे आव्हान आहे. आपण ते कसे पेलतो, यावरच पुढील दहशतवादी हल्ले थांबणार का वाढणार, हे अवलंबून आहे !

### एकदा होऊन जाऊ द्या !

पाकिस्तानी नागरिकांना देशाबाहेर हाकलून आणि महत्त्वाची पाच पावले उचलून मोदी सरकारने जोरदार तयारी केली आहे. युद्धसरावही सुरू झाला आहे. त्यामुळे आता एवढेच सांगणे आहे, की आता एकदाचे होऊन जाऊ द्या. जात, धर्म, पंथ काढत बसण्यापेक्षा हा हिरवा दहशतवाद कायमचा बंद करण्यासाठी भगव्या क्षेपणास्त्रांची जुळवाजुळव महत्त्वाची आहे. वर्षानुवर्षे या हिरव्या दहशतवादाचा भारत हा मोठा बळी आहे. या जखमा मिटवायच्या असतील आणि पुन्हा होऊ नये असे वाटत असेल तर त्यावर भगवे मलम हाच जालीम इलाज आहे, हे नक्की !

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महायुतीमध्ये समन्वयाचा अभाव?

## एकही पाकिस्तानी नागरिक हरवलेला नाही : फडणवीस

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पाकिस्तानी नागरिकांवरून राज्यातील महायुतीच्या सरकारमध्ये समन्वयाचा आभाव पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रातील १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता असल्याचं वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. तर, राज्यात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांपैकी एकही जण बेपत्ता नाही असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. तसेच सर्व पाकिस्तानी आज संध्याकाळी किंवा उद्या सकाळपर्यंत राज्य सोडून निघन जातील, असंही फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे.**



एकनाथ शिंदे म्हणाले,"केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे की पाकिस्तानी नागरिकांनी आमचा देश सोडून निघून जावं. पाकिस्तानी नागरिकांनो चालते व्हा असं फर्मान त्यांनी काढलं आहे. हे प्रत्येक भारतीयांच्या मनातलं फर्मान आहे. ही तुमच्या आमच्या मनातली इच्छा आहे. महाराष्ट्रातही काही पाकिस्तानी नागरिक होते. त्यापैकी १०७ पाकिस्तानी नागरिक कुठेतरी बेपत्ता झाल्याची माहिती मिळाली आहे. मात्र माझं त्यांना सांगणं आहे की तुम्ही जिथे कुठे असाल तिथून चालते व्हा. पाकिस्तानी नागरिकांनी आमचा देश सोडून निघून जावं, अन्यथा पोलीस तुम्हाला शोधतील आणि जागेवरच ठोकतील. कारण लोकांच्या मनात चीड आणणारी घटना (पहलगामधील दहशतवादी हल्ला) घडली आहे.दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांचा दावा खोडून काढला आहे. फडणवीस यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी काही वार्ताहरांनी फडणवीस यांना एकनाथ शिंदे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारली असता फडणवीस म्हणाले,

"१०७ नागरिक हरवल्याचं बोललं जात आहे. मात्र, एकही पाकिस्तानी नागरिक हरवलेला नाही."मुख्यमंत्री म्हणाले, "जेवढे पाकिस्तानी नागरिक महाराष्ट्रात आले होते ते सगळे सापडले आहेत आणि सगळे आता देशाबाहेर चालले आहेत. या सर्वांची स्वगृही परत पाठवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. एकही पाकिस्तानी नागरिक आपल्या राज्यात राहणार नाही. माझा अंदाज आहे की आज संध्याकाळी किंवा उद्या सकाळपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होऊन जाईल. त्यानंतर एकही पाकिस्तानी आपल्याला दिसणार नाही."एकनाथ शिंदे म्हणाले, "केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे की पाकिस्तानी नागरिकांनी आमचा देश सोडून निघून जावं. पाकिस्तानी नागरिकांनो चालते व्हा असं फर्मान त्यांनी काढलं आहे. हे प्रत्येक भारतीयांच्या मनातलं फर्मान आहे. ही तुमच्या आमच्या मनातली इच्छा आहे. महाराष्ट्रातही काही पाकिस्तानी नागरिक होते. त्यापैकी १०७ पाकिस्तानी नागरिक कुठेतरी बेपत्ता झाल्याची माहिती मिळाली आहे. मात्र माझं त्यांना सांगणं आहे की तुम्ही जिथे कुठे असाल तिथून चालते व्हा. पाकिस्तानी नागरिकांनी आमचा देश सोडून निघून जावं, अन्यथा पोलीस तुम्हाला शोधतील आणि जागेवरच ठोकतील. कारण लोकांच्या मनात चीड आणणारी घटना (पहलगामधील दहशतवादी हल्ला) घडली आहे.दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांचा दावा खोडून काढला आहे. फडणवीस यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी काही वार्ताहरांनी फडणवीस यांना एकनाथ शिंदे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारली असता फडणवीस म्हणाले,मुख्यमंत्री म्हणाले, "जेवढे पाकिस्तानी नागरिक महाराष्ट्रात आले होते ते सगळे सापडले आहेत आणि सगळे आता देशाबाहेर चालले आहेत.

### एकही जण बेपत्ता नाही : फडणवीस

या सर्वांची स्वगृही परत पाठवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. एकही पाकिस्तानी नागरिक आपल्या राज्यात राहणार नाही. माझा अंदाज आहे की आज संध्याकाळी किंवा उद्या सकाळपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होऊन जाईल. पाकिस्तानी नागरिकांवरून राज्यातील महायुतीच्या सरकारमध्ये समन्वयाचा आभाव पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रातील १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता असल्याचं वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. तर, राज्यात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांपैकी एकही जण बेपत्ता नाही असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

# पहलगामचा हल्ला देशासाठी धक्का!

## काही लोक धार्मिक विचार देण्याचा प्रयत्न करत आहेत: शरद पवार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पहलगाम या ठिकाणी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या भ्याड हल्ल्याचा निषेध जगभरातून केला जातो आहे. तसंच या हल्ल्याबाबत विविध प्रतिक्रियाही उमटत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात या कार्यक्रमातही दहशतवाद्यांना आम्ही सोडणार नाही असं म्हटलं आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते शरद पवार यांचीही एक वक्तव्य समोर आलं आहे.**



भारतवासीयांवर हल्ला झाला आहे. त्यामुळे राजकारणात मतभिन्नता असेल. पण जेव्हा देशावर हल्ला होतो तेव्हा मतभिन्नता नाही. आत्ता भूमिका एकच देश एकत्र ठेवणं. त्यानंतर या गोष्टींचा विचार करतो. गेल्या काही दिवसांपासून आपण पहलगामचा विषय ऐकत आहोत. अतिरेक्यांनी हल्ले केले. निष्पाप लोकांचा बळी घेतला. जे काही घडलं ती घटना देशाला धक्का होती. हा कुठलाही जाती-धर्माला धक्का नव्हता. हा भारताला धक्का होता. भारतवासीयांवर हल्ला झाला. आता देशवासीयांसाठी ही जबाबदारी असते की राजकारणात ही मतभिन्नता नाही. केंद्र सरकारने दहशतवादी हल्ल्यानंतर सर्वपक्षीय बैठक बोलवली. त्या बैठकीला आपल्या पक्षाकडून सुप्रिया सुळे उपस्थित होत्या, देशाच्या गृहमंत्र्यांनी अत्यंत समंजस भूमिका घेतली. त्यांनी हे सांगितलं की कुठेतरी कमतरता आमच्याकडून झाली. या कमतरतेवर आज चर्चा नाही. ज्यांच्यावर हल्ले झाले त्यांच्या कुटुंबीयांमध्ये विश्वासाचं वातावरण कसं निर्माण करता येईल हे आता पाहिलं पाहिजे." असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. आज देश संकटात असताना त्या कमतरतांवर चर्चा करण्याची वेळ नाही. काही लोक या परिस्थितीला धार्मिक विचार देण्याचा प्रयत्न करत आहेत.

### रावसाहेब पवार काय म्हणाले?

जे देशासाठी अतिशय धोकादायक आहे. देशाच्या एकतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड करता येणार नाही, जेव्हा निवडणूक होईल तेव्हा बघू, असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे. असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे. ज्येष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात शरद पवार उपस्थित होते. त्यावेळी शरद पवार यांनी हे वक्तव्य केलं आहे. रावसाहेब पवार म्हणाले की, शरद पवार हे एक विचार आहेत. ज्या पद्धतीने आजचे राजकारण सुरू आहे, ते देशासमोरील सगळ्यात मोठं आव्हान आहे. आज विचारहीन राजकारण सुरू. लोकांना न्याय मिळवून द्यायचा असेल, संविधानात जिवंत ठेवायचं असेल, तर समाजवादाशिवाय पर्याय नाही. दगडात परमेश्वर नाही. ही परिस्थिती अशीच राहिली तर ब्रिटिश परवडले. पण, या पुढचा काळ परवडणार नाही, असंही रावसाहेब पवार म्हणाले.

# आता सर्जिकल स्ट्राइक नको!

## थेट पाकिस्तान व्याप्त काश्मीर ताब्यात घ्या : अभिषेक बॅनर्जी

**।ओडिशा।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर तृणमूल काँग्रेस पक्षाचे नेते आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी रविवारी पाकिस्तानला धडा शिकवण्याची तसेच पाकिस्तानच्या ताब्यात असलेला काश्मीरचा भाग परत घेण्याची वेळ आली असल्याचे म्हटले आहे.**

पाकिस्तानवर आणखी सर्जिकल स्ट्राईक किंवा प्रतीकात्मक इशारा देण्याची ही वेळ नाही. ही वेळ त्यांना कळेल अशा भाषेत धडा शिकवण्याची आहे. पाकिस्तान व्याप्त काश्मीर (पीओके) परत घेण्याची वेळ आली आहे," असे टीएमसी खासदार बॅनर्जी त्यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. तसेच बॅनर्जी यांनी पक्ष राजकारणाचा विचार सोडून या मुद्द्यावर कायमचा तोडगा काढला पाहिजे असेही बॅनर्जी यावेळी म्हणाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून आपण मुख्य प्रवाहातील माध्यमांचे आणि केंद्र सरकारमधील लोकांचे वर्तन आपण बारकाईने पाहत आहोत, या पूर्वी कधीही न घडलेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यासाठी कारणीभूत त्रुटींचा सखोल तपास करण्याऐवजी ते एका विशिष्ट राजकीय पक्षाला फायदा होईल अशा गोष्टी सांगण्यावर लक्ष केंद्रीत करत आहेत."अशा क्षुल्लक राजकारणापासून राजकारणाच्या पलीकडे जाऊन या प्रश्नावर एकदाच कायमचा तोडगा काढण्याची वेळ आली आहे," असेही बॅनर्जी यावेळी म्हणाले आहेत.२२ एप्रिल रोजी जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्या २६ जणांचा मृत्यू झाला आहे, यापैकी बहुतांश जण हे पर्यटक होते. यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध ताणले गेले आहेत.पहलगाम दहशतवादी हल्ल्यामागील



दहशतवाद्यांना आणि कटात सहभागी असलेल्यांना कठोर शिक्षा दिली जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी पुन्हा सांगितले आहे. तसेच मोदींनी पीडितांना न्याय मिळेल असे म्हटले आहे. तसेच 'मन की बात' या कार्यक्रमात बोलताना मोदी म्हणाले की, दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारतीयांची एकता ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे.टीएमसी खासदार बॅनर्जी त्यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत.

तसेच बॅनर्जी यांनी पक्ष राजकारणाचा विचार सोडून या मुद्द्यावर कायमचा तोडगा काढला पाहिजे असेही बॅनर्जी यावेळी म्हणाले आहेत.गेल्या काही दिवसांपासून आपण मुख्य प्रवाहातील माध्यमांचे आणि केंद्र सरकारमधील लोकांचे वर्तन आपण बारकाईने पाहत आहोत, या पूर्वी कधीही न घडलेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यासाठी कारणीभूत त्रुटींचा सखोल तपास करण्याऐवजी ते एका विशिष्ट राजकीय पक्षाला फायदा होईल अशा गोष्टी सांगण्यावर लक्ष केंद्रीत करत आहेत."अशा क्षुल्लक राजकारणापासून राजकारणाच्या पलीकडे जाऊन या प्रश्नावर एकदाच कायमचा तोडगा काढण्याची वेळ आली आहे," असेही बॅनर्जी यावेळी म्हणाले आहेत.२२ एप्रिल रोजी जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्या २६ जणांचा मृत्यू झाला आहे, यापैकी बहुतांश जण हे पर्यटक होते. यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध ताणले गेले आहेत.

### तोडगा काढण्याची वेळ आली

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर तृणमूल काँग्रेस पक्षाचे नेते आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी रविवारी पाकिस्तानला धडा शिकवण्याची तसेच पाकिस्तानच्या ताब्यात असलेला काश्मीरचा भाग परत घेण्याची वेळ आली असल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानवर आणखी सर्जिकल स्ट्राईक किंवा प्रतीकात्मक इशारा देण्याची ही वेळ नाही. ही वेळ त्यांना कळेल अशा भाषेत धडा शिकवण्याची आहे. पाकिस्तान व्याप्त काश्मीर (पीओके) परत घेण्याची वेळ आली आहे," असे टीएमसी खासदार बॅनर्जी त्यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. तसेच बॅनर्जी यांनी पक्ष राजकारणाचा विचार सोडून या मुद्द्यावर कायमचा तोडगा काढला पाहिजे असेही बॅनर्जी यावेळी म्हणाले आहेत.गेल्या काही दिवसांपासून आपण मुख्य प्रवाहातील माध्यमांचे आणि केंद्र सरकारमधील लोकांचे वर्तन आपण बारकाईने पाहत आहोत, या पूर्वी कधीही न घडलेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यासाठी कारणीभूत त्रुटींचा सखोल तपास करण्याऐवजी ते एका विशिष्ट राजकीय पक्षाला फायदा होईल अशा गोष्टी सांगण्यावर लक्ष केंद्रीत करत आहेत."अशा क्षुल्लक राजकारणापासून राजकारणाच्या पलीकडे जाऊन या प्रश्नावर एकदाच कायमचा तोडगा काढण्याची वेळ आली आहे.

# भारतात टेस्लाची पहिली कार दाखल!

## पहिल्या सायबरट्रकचे मालक रिअल इस्टेट डेव्हलपर लवजी बादशाह

**।मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारताची डायमंड सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुरतमध्ये गेल्या काही दिवसांपासून टेस्लाचा सायबरट्रक मोठा चर्चेचा विषय ठरत आहे. सुरतमधील करोडपतींपैकी एक असलेले लवजी दलिया उर्फ लवजी बादशाह यांच्याकडे टेस्लाच्या फाउंडेशन सिरीजची भारतातील पहिली सायबरट्रक कार असल्याचा दावा केला जात आहे. दलिया हे रिअल इस्टेट डेव्हलपर आणि गोपिन ग्रुपचे प्रवर्तक आहेत.**

दलिया यांचा मोठा मुलगा पीयूष यांनी द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले की, "आम्ही ऑनलाइन चौकशी केल्यानंतर,





समजले की ही भारतातील टेस्लाची एकमेव कार आहे. भारतात आतापर्यंत अशी कोणतीही कार आयात केलेली नाही. आम्ही सहा महिन्यांपूर्वी अमेरिकेतील टेक्सास येथील टेस्ला शोरूममध्ये ही कार बुक केली होती. सर्व कायदेशीर प्रक्रियेनंतर, आम्हाला काही दिवसांपूर्वी डिलिव्हरी मिळाली, म्हणून आम्ही कार दुबईला आणली जिथे रोड रजिस्ट्रेशन झाले. त्यानंतर, टेस्लाची ही कार समुद्री मार्गाने भारतात आणली."एलोन मस्क यांच्या टेस्लाने बनवलेली ही कार गुरुवारी (२४ एप्रिल रोजी) सुरतमध्ये पोहोचली. टेस्लाच्या या सायबरट्रक कारची मूळ किंमत ७०,००० अमेरिकन डॉलर्स इतकी आहे. भारतीय रुपयांमध्ये याची किंमत सुमारे ६० लाख रुपये इतके आहे.या कारची किंमत किती होती हे न सांगता, पियुष म्हणाले "लॉजिस्टिक्स चार्जेस खूप जास्त होते. या कारमध्ये पाच लोक बसू शकतात. कार

सुरतमध्ये उतरल्यानंतर, मी माझे आईवडील आणि धाकटा भाऊ यांना घेऊन गाडी चालवली. ही गाडी चालवणे हा एक अद्भुत अनुभव होता. आम्हाला आशा आहे की, टेस्ला कंपनी भारतात त्यांचे शोरूम लवकरच उघडेल. भारतातील कार प्रेमींमध्ये या टेस्लाला मोठी मागणी आहे."मूळ भावनगरचे असलेले ५५ वर्षीय लवजीभाई 'बादशाह' काही वर्षांपूर्वी हिरे व्यवसाय सुरू करण्यासाठी सुरतला स्थलांतरित झाले होते. ते म्हणाले, "सध्या, आम्ही सुरतमध्ये ही कार वापरत आहोत आणि आम्ही महामार्गांवर किंवा इतर जिल्ह्यांमध्ये कोणताही प्रवास केलेला नाही. शहरात, आम्ही जिथे जातो तिथे, सुमारे ५० ते १०० लोक कार पाहण्यासाठी गोळा होतात. लोकांना या कारबद्दल खूप उत्सुकता आहे. त्यांना कारच्या इंटेरिअर्स आणि इतर पैलूंबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता आहे. आम्हाला जास्त काळजी घ्यावी लागते.

### टेस्ला भारतात शोरूम उघडेल

ज्यामध्ये वक्र आहेत आणि टायर अशा प्रकारे डिझाइन केले आहेत की कार खडबडीत रस्त्यांवर देखील चांगल्या पद्धतीने धावू शकते.भारतात आतापर्यंत अशी कोणतीही कार आयात केलेली नाही. आम्ही सहा महिन्यांपूर्वी अमेरिकेतील टेक्सास येथील टेस्ला शोरूममध्ये ही कार बुक केली होती.

# समजा आपण त्या जागी असतो तर : विशाखा सुभेदार

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे देशभरात संतापाची लाट पसरली आहे. या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर निर्णय घेतले. अशातच, सोशल मीडियावर पहलगाम हल्ल्याबद्दल विशाखा सुभेदारने ( VISHAKHA SUBHEDAR ) लिहिलेल्या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तिची ही पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे. विशाखा सुभेदारने ( VISHAKHA SUBHEDAR ) फेसबुकवर ही पोस्ट लिहिली आहे. तिने लिहिलं की, इंटरनेट, सोशल



मीडिया सध्या सगळीकडे एकाच विषयावर बोलणं सुरू आहे पहलगाममध्ये घडलेली भयावह घटना... हिंसेला, आतंकवादाला वृत्ती जबाबदार की मती? 'असं व्हायला नको!', 'तसं व्हायला हवं', 'यांनी हे करायला हवं', 'त्यांनी तसं बोलायला हवं' पण ज्यांच्यावर तो प्रसंग ओढवला त्यांनी काय करायचं? आपलं माणूस गमावल्याचं दुःख, शोक करायचा आणि जाब विचारायचा तर तो कोणाला? ही गमावलेली माणसं येतील का परत?पुढे विशाखा सुभेदार लिहिलं, "जात, धर्म, वर्ण, भेद त्याचं केलं जाणारं राजकारण अशा आणि बऱ्याच गोष्टी आहेत. पण एखाद्या निष्पाप माणसाला जीवे मारण्याची वृत्ती ही येते कशी आणि कुठून? ही शिकवण देणारे आणि ती आपल्या चांगल्याचसाठी आहे हे मानणाऱ्यांना कसे थांबवायचे?

# राखीचा बुरखा घालून व्हिडीओ



गेल्या सहा वर्षांतील सर्वात मोठा दहशतवादी हल्ला २२ एप्रिलला जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झाला. पहलगाम येथील 'छोटे स्वित्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरनमध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केलं. यामध्ये २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. त्यामुळे सर्व स्तरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. भारतच नाही तर जगभरातून या दहशतवादी हल्ल्याविरोधात निषेध व्यक्त केला जात आहे. बॉलीवूड सेलिब्रिटी संताप व्यक्त करताना दिसत आहे. अशातच सुनील शेट्टीने पुढची सुट्टी काश्मीरमध्ये एन्जॉय करणार असल्याचं सांगितलं. तसंच राखी सावंतने देखील काश्मीर जाण्याचा निर्धार केला आहे. ती चाहत्यांना काश्मीर जाण्याचं आवाहन करताना दिसत आहे. राखी सावंतने तिच्या इन्स्टाग्राम पेजवर नुकताच एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये ती बुरखा घालून संवाद साधताना दिसत आहे. राखी म्हणते, "सलाम वालेकुम सभी को, नमस्ते, सत श्री अकाल, जय भारत, जय भीम, जय हिंदुस्तान, भारत माता की जय. आता आनंदी आहात. आपण सगळे एक आहोत. आपल्या हिंदुस्तानातून मुस्लिमांना कोणीही बाहेर काढू शकत नाही. भारत जितका हिंदूंचा आहे, तितकाच मुसलमानांचा देखील आहे. हिंदू-मुस्लिम असं करू नका. लहान मुलांसारख वागू नका. मोठे व्हा. जरा देवावर दया करा. देवाला इतक्या वेदना होतं आहेत की, मी या लोकांना निर्माण केलं आहे आणि ही सर्व माझी मुलं आहेत, माझी माणसं आहेत. पण, का लढत आहेत आणि मरत आहेत. यांना काय पाहिजे?"

# नवीना बोलेने साजिदवर केले गंभीर आरोप

बॉलीवूड इंडस्ट्री असो वा मराठी इंडस्ट्री... या क्षेत्रात काम करताना अनेक कलाकार मंडळींना कधी ना कधी त्यांच्या दिसण्यामुळे ट्रोलिंग आणि नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना करावा लागतो. मुख्यत: या क्षेत्रात काम करताना अनेक महिला कलाकारांना अशा घटनांचा अधिक सामना करावा लागतो. असंच एका कलाकाराबरोबरही झालं होतं आणि ही कलाकार म्हणजे बॉलीवूडमधील लोकप्रिय व विनोदी अभिनेते जॉनी लिवर (JOHNNY LEVER) यांची मुलगी जेमी लिवर (JAMIE LEVER). जेमीला तिच्या लूकमुळे नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना करावा लागला होता.जॉनी लिवर यांनी आजवर अनेक सुपरहिट हिंदी चित्रपटांमध्ये काम केलं आहे. आपल्या विनोदी भूमिकांनी त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत त्यांची मुलगी जेमी लिवर हिनं या क्षेत्रात पदार्पण केलं आहे. मात्र, इतर स्टार किड्सप्रमाणे तिला अगदी सहज प्रसिद्धी मिळालेली नाही. ती संघर्ष करीत या क्षेत्रात स्वतःचं स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, तिच्या दिसण्यामुळे तिला खूप त्रास झाला होता आणि यामुळे तिच्यावर टीकाही झाली होती.जेमी लिवरनं अलीकडेच टीव्ही अभिनेत्री छवी मित्तलच्या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिनं काही वर्षांत लोकांच्या मताचा आणि टीकेचा कसा सामना केला आणि याचा तिच्यावर कसा परिणाम झाला याबद्दल सांगितलं. त्याबद्दल जेमी म्हणाली, "एके दिवशी मी फोटोशूट करीत होती आणि मेकअप आर्टिस्टने सांगि



# सूरज आमच्या घरी आला होता: निक्की तांबोळी

केदार शिंदे दिग्दर्शित 'झापुक झुपूक' हा मराठी सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. २५ एप्रिल २०२५ ला हा चित्रपट प्रदर्शित झाला. बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट उत्तम कमाई करीत असल्याचे समोर आलेल्या आकडेवारीवरून दिसत आहे. 'झापुक झुपूक' या चित्रपटात सूरज चव्हाण, जुई भागवत, इंद्रनील कामत हे कलाकार प्रमुख भूमिकांत दिसत आहेत. आता निक्की तांबोळीने सूरज चव्हाणच्या चाहत्यांसाठी एक खास गोष्ट केली आहे. तिने सूरजच्या चाहत्यांसाठी झापुक झुपूक या सिनेमासाठी थिएटर बुक केले आहे.'नवशक्ती' या चॅनेलने निक्की तांबोळीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला. या व्हिडीओमध्ये निक्की तांबोळी म्हणते, "काही दिवसांपूर्वी सूरज चव्हाण आमच्या घरी आला होता. त्याला शुभेच्छा देण्यासाठी मी एक व्हिडीओ बनवला होता. ज्यामध्ये मी म्हटलं होतं की त्याच्या चाहत्यांना मी त्याच्या चित्रपटांची तिकिटे देईन. त्यानंतर मला बरेच मेसेज आले. मग मी ठरवलं की, सूरजच्या चाहत्यांसाठी थेट शो बुक करते.निक्की तांबोळी पुढे म्हणाली, "सध्या मी उद्याचे दोन शो आधीच बुक केले आहेत. पुण्यातील मंगला थिएटरचा ७ चा शो आणि सिटी प्राइड कोथरूडला दुपारी ४ चा शो बुक केला आहे. त्यामुळे जे पुण्यात आहेत, त्यांनी नक्की भेट द्या."पुढे निक्की तांबोळीने असेही म्हटले की, मला हा सिनेमा खूप आवडला आहे.

# विराट कोहली कधीच विसरत नाही!

## विजयानंतर राहुलला ग्राऊंड' सेलिब्रेशन करत चिडवलं

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आरसीबीने दिल्लीच्या घरच्या मैदानावरच त्यांचा ६ विकेट्स आणि ८ चेंडू राखून दणदणीत विजय मिळवला. दिल्लीच्या फलंदाजीसाठी खडतर खेळपट्टीवर आणि दिल्लीच्या उत्कृष्ट गोलंदाजी युनिटसमोर विराट आणि कृणाल पंड्याने ११९ धावांची भागीदारी रचत संघाला विजय मिळवून दिला. आरसीबीने दिल्लीकडून मागील सामन्यातील पराभवाचा मोठा बदला घेतला आहे.**



या विजयानंतर विराट कोहलीने केएल राहुलच्या 'हे माझं होम ग्राऊंड आहे' या सेलिब्रेशनची नक्कल केली आहे. ज्याचा व्हीडिओ आता व्हायरल होत आहे.चिन्नास्वामीच्या मैदानावर १० एप्रिलला झालेल्या त्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने आरसीबीचा घरच्या मैदानावर पराभव केला होता. आरसीबीने दिल्लीला विजयासाठी १६४ धावांचं आव्हान दिलं होतं. दिल्लीने सुरुवातीचे ३ विकेट्स गमावल्यानंतर केएल राहुलच्या ५३ चेंडूत ७ चौकार आणि ६ षटकारांच्या ९३ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर गाठलं होतं. दिल्लीने १७.५ षटकांत हे लक्ष्य गाठत आरसीबीचा मानहानीकारक पराभव केला होता.दिल्लीच्या त्या सामन्यातील विजयाचा हिरो ठरलेला केएल राहुल हा मूळचा बंगळुरूचा आहे आणि चिन्नास्वामी स्टेडियम हे त्याचं होम ग्राऊंड आहे. राहुलने त्या सामन्यात १५व्या षटकात गियर बदलत तुफान फटकेबाजी केली आणि संघाला विजय मिळवून दिला. या विजयानंतर केएल राहुलने मैदानावर बॅट उभी आपटत कांतारा स्टाईल सेलिब्रेशन करत हे माझं ग्राऊंड आहे म्हटलं होतं. त्याच्या या सेलिब्रेशनचा व्हीडिओ चांगलाच व्हायरल झाला होता. विराट कोहलीने आता राहुलच्या या सेलिब्रेशनची नक्कल केली आहे. केएल राहुल सामन्यानंतर देवदत्त पडिक्कल, करूण नायर यांच्याबरोबर बोलत होता. तितक्यात मधून विराट कोहली आला आणि त्याने कांतारा स्टाईल सेलिब्रेशन केलं. राहुलने पहिल्या वेळेस पाहिलं नाही म्हणून विराटने परत सेलिब्रेशनची नक्कल केली, राहुलही ते पाहून हसू लागला आणि विराटने हसत हसत त्याला मिठी मारली. विराट आणि राहुलचा हा मजा मस्करी करतानाचा व्हीडिओ व्हायरल होत आहे. विराट कोहलीच्या या नक्कलनंतर चाहते व्हीडिओ फोटो शेअर करत विविध प्रतिक्रिया देत आहेत. काही जण म्हणत आहेत की विराट कोहली कधीच काही विसरत नाही आणि विजयानंतर त्याने हे सेलिब्रेशन करत बदला घेतला आहे. तर काही जण विराटच्या ॲक्टिंगचं कौतुक करत आहेत. तर काही चाहते विराट आणि राहुलच्या बॉन्डिंगबद्दल प्रशंसा करत आहेत.आरसीबीने यंदाच्या मोसमातील प्रतिस्पर्धी संघाच्या मैदानावरील सर्व सहा सामने जिंकले आहेत. तर आतापर्यंत आरसीबीने १० पैकी सात सामने जिंकत सर्वाधिक १४ गुणांसह संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानी आहे. तर दिल्लीचा संघ चौथ्या स्थानी आहे.न्नास्वामीच्या मैदानावर १० एप्रिलला झालेल्या त्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने आरसीबीचा घरच्या मैदानावर पराभव केला होता. आरसीबीने दिल्लीला विजयासाठी १६४ धावांचं आव्हान दिलं होतं. दिल्लीने सुरुवातीचे ३ विकेट्स गमावल्यानंतर केएल राहुलच्या ५३ चेंडूत ७ चौकार आणि ६ षटकारांच्या ९३ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर गाठलं होतं. चिन्नास्वामी स्टेडियम हे त्याचं होम ग्राऊंड आहे. राहुलने त्या सामन्यात १५व्या षटकात गियर बदलत तुफान फटकेबाजी केली आणि संघाला विजय मिळवून दिला.

### राहुलही ते पाहून हसू लागला

या विजयानंतर केएल राहुलने मैदानावर बॅट उभी आपटत कांतारा स्टाईल सेलिब्रेशन करत हे माझं ग्राऊंड आहे म्हटलं होतं. त्याच्या या सेलिब्रेशनचा व्हीडिओ चांगलाच व्हायरल झाला होता.विराट कोहलीने आता राहुलच्या या सेलिब्रेशनची नक्कल केली आहे. केएल राहुल सामन्यानंतर देवदत्त पडिक्कल, करूण नायर यांच्याबरोबर बोलत होता. तितक्यात मधून विराट कोहली आला आणि त्याने कांतारा स्टाईल सेलिब्रेशन केलं. राहुलने पहिल्या वेळेस पाहिलं नाही म्हणून विराटने परत सेलिब्रेशनची नक्कल केली, राहुलही ते पाहून हसू लागला आणि विराटने हसत हसत त्याला मिठी मारली. विराट आणि राहुलचा हा मजा मस्करी करतानाचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.विराट कोहलीच्या या नक्कलनंतर चाहते व्हीडिओ फोटो शेअर करत विविध प्रतिक्रिया देत आहेत.

# मुंबई इंडियन्सने इतिहास घडवला!

## लखनौला वानखेडेवर ऑल आऊट करत चारली धुळ

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जसप्रीत बुमराहच्या ४ विकेट्सच्या जोरावर मुंबई इंडियन्सने लखनौ सुपर जायंट्सच्या फलंदाजीचं कंबरड मोडलं. यासह मुंबईने लखनौचा वानखेडेच्या मैदानावर ५४ धावांनी मोठा पराभव केला आहे. यासह मुंबई इंडियन्सने यंदाच्या मोसमातील सलग पाचवा विजय मिळवला आहे.**



मुंबईने लखनौला विजयासाठी २१६ धावांचं लक्ष्य दिलं होतं. पण मुंबईच्या भेदक गोलंदाजीसमोर लखनौचा संघ २० षटकांत फक्त १६१ धावा करत क्लीन बोल्ड झाला.संपूर्ण संघ तुफान फॉर्मात असलेल्या मुंबई इंडियन्सने लखनौ सुपर जायंट्स संघावर ५४ धावांनी मोठा विजय मिळवला आहे. या मोठ्या विजयासह मुंबईचा नेट रन रेट वाढला असून चॅम्पियन मुंबई इंडियन्सचा संघ १२ गुणांसह थेट दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे.मुंबई इंडियन्सने दिलेल्या २१६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनौची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. मिचेल मार्श आणि एडन मारक्रम यांनी फटकेबाजी केली खरी, पण तिसऱ्या षटकात बुमराहने संघाला पहिला ब्रेकथ्रू मिळवून दिला.
एडन मारक्रम ९ धावा करत बाद झाला. तर मिचेल मार्श ३४ धावा करत बाद झाला. निकोलस पुरन आणि मार्शने पॉवरप्लेमध्ये संघाला ६० धावांचा टप्पा गाठून दिला. पण विल जॅक्सने पुरन आणि पंतला एका षटकात बाद करत सामना मुंबईच्या बाजूने फिरवला.आयुष बदोनीने संघाचा डाव सावरला, पण मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी फलदाजांना सामन्यात परतण्याची फारशी संधी दिली नाही. आयुष बदोनी २२ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह ३५ धावा करत बाद झाला. लखनौकडून ही फलंदाजाची सर्वाधिक धावसंख्या होती.
याशिवाय रवी बिश्नोईने १३ धावा केल्या.जसप्रीत बुमराहने १६व्या षटकात मिलर, अब्दुल समद व आवेश खानला क्लीन बोल्ड करत ३ विकेट्स घेतल्या आणि मुंबईचा विजय निश्चित केला. यानंतर मुंबईकडून पदार्पण करणाऱ्या कार्बिन बॉशने १९व्या षटकात बिश्नोईला क्लीन बोल्ड करत पहिली आयपीएल विकेट मिळवली.
तर बोल्टने अखेरच्या षटकातील पाचव्या चेंडूवर दिग्वेश राठीला क्लीन बोल्ड करत लखनौला १६१ धावांवर क्लीन बोल्ड केलं. मुंबईकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ४ विकेट्स घेतले.

### रिकल्टनने संघाचा डाव सावरला

लखनौने नाणेफेक जिंकत मुंबई इंडियन्सला फलंदाजीसाठी पाचारण केलं. रायन रिकल्टन आणि रोहित शर्माने चांगली फटकेबाजी करत संघाला चांगली सुरूवात करून दिली. पण रोहित शर्मा २ षटकारांसह १२ धावा करत झेलबाद झाला. पण यानंतर रायन रिकल्टनने संघाचा डाव सावरला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

। सोमवार ।

। दि. 28 एप्रिल 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती






Gayatri English Medium School
& Jr. College, Moshi
We're Hiring
AI/ML Freshers!
Eligible?
• B.E./B.Tech in CS/IT/AI/DS
• Solid ML & Python skills
• Passion for AI/ML?
Internship-cum-Placement | Min. 6.5 CGPA
Apply now & work on real-world AI projects!
APPLY TODAY!
Let's build the future together.
Location: Pune
gayatriems@gmail.com
9689881670

ADMISSION OPEN

From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday

Moaraya Shikshan Sanstha
Computer Vacation
Batch

Our Courses



- Corel Draw
- Adobe Photoshop
- Scratch Animation
- 'C' Language
- 'C ++' Language
- Basic Java
- Basic Tally
- M. S. Office

Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA
Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



# BBA

**Bachelor of Business Administration**



# BCA

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7
STAR
RANKING
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com